# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## पालघर जिल्ह्यातील जंगल व किनारपट्टी भागातील पक्ष्यांचे संरक्षण करण्याबाबत

**(१) ८४०८ (१५-०७-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जंगलपट्टी व किनारपट्टीतील विविध गावात शोभिवंत पक्षांची हत्या करुन त्यांची ट्रॉफी बनवून विक्री करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावांमध्ये पाणथळ डोंगरदऱ्यात पक्षांवर विषप्रयोग करणारी टोळी सक्रिय झाली असल्याचे निदर्शनास आले असूनही वन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टोळीने माकुणसार, विळंगी या परिसरात अनेक पक्षी मारल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पक्षांची हत्या करणाऱ्यांवर कारवाई करुन पक्षांचे संरक्षण करण्यासंदर्भांत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) क्षेत्रिय स्तरावर वन्यजीवांच्या संरक्षणाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन विभागातील प्रत्येक गावामध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समिती, वनकर्मचारी व ग्रामस्थांमध्ये समन्वय साधून वनांचे तसेच वन्यजीवांचे रक्षण केले जाते.
- क्षेत्रिय स्तरावर रात्रगस्त कार्यक्रमांतर्गत वनांचे / वन्यजीवांचे संरक्षण करण्यात येते.
- स्थानिक ग्रामस्थांमध्ये वन व वन्यजीवांबाबत जनजागृती करण्यात येते.
- खबऱ्यांच्या माध्यमातून वन्यप्राण्यांच्या अवैध शिकार व तस्करीबाबत माहिती मिळवून त्या अनुषंगाने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२) ८७९७ (२०-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत मुस्लीम समाजाकडून करण्यात येत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन शासनाने दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी मुस्लीम (विशेष मागास प्रवर्ग) समाजासाठी नोकरी व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नसल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लीम (विशेष मागास प्रवर्ग) समाजासाठी नोकरी व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे, सदरहू निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९/०७/२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लिम (विशेष मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम धर्मातील एकूण ५० मागास घटकांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहणार होता. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनाक ०९/०७/२०१४ ते दिनांक २३/१२/२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक १४/११/२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत. तथापि, आरक्षणाची मर्यादा ५०% पेक्षा जास्त होत असल्यामुळे सद्य:स्थितीत सदर आरक्षण देता येणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कहोज किल्ला (ता.वाडा, जि.पालघर) परिसरातील वनसंपत्ती नष्ट होत असल्याबाबत.

**(३) ११७२५ (२९-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐतिहासिक कहोज किल्ल्याच्या (ता.वाडा, जि.पालघर) हजारो हेक्टर क्षेत्रावर स्थित असलेल्या वन परिसरात समाजकंटकाकडून जंगली प्राण्यांची शिकार करणे व मौल्यवान लाकडे चोरुन वन संपत्तीस आग लावणे इत्यादी घटना दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन संपत्ती नष्ट करणाऱ्या दोषींवर तसेच कहोज किल्ल्याच्या परिसरातील वन संपत्तीचे संवर्धन व जतन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

कहोज किल्ल्याच्या परिसरामध्ये वनविभागाच्या ताब्यातील कंचाड वनक्षेत्र अंतर्गत १५ जानेवारी, २०२१ च्या सुमारास समाजकंटकाकडून जंगली प्राण्याची शिकार करणे व मौल्यवान लाकडे चोरुन वन संपत्तीस आग लावणे इ. घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.
(२) हे खरे नाही.

कहोज किल्ल्याच्या परिसरातील प्रादेशिक विभागाच्या ताब्यातील वनसंपत्तीचे संवर्धन व जतन करण्याच्या दृष्टीने गस्तीचा कार्यक्रम आखून रात्र दिवस गस्त केली जाते. परिसरातील गावामध्ये भिंतीपत्रक व बॅनरच्या माध्यमातून वनसंपत्तीचे रक्षण करण्यासंदर्भात जनजागृती केली जाते. तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून वनसंरक्षण विषयक जनजागृती करण्यात येते.

वनसंरक्षणासाठी पायदळ गस्त करण्यात येते तसेच रात्र गस्त वाहनाने करण्यात येते. तसेच वन विकास महामंडळाच्या ताब्यातील क्षेत्राकरीता १० वर्षाचा व्यवस्थापन आराखडा केंद्र शासनाने मंजूर केलेला असून त्यानुसार वन संवर्धनाची कामे करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व पालखी मार्ग पूर्ण करण्याबाबत

**(४) १२०९९ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज ह्या पालखी मार्गावरून जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी पालखी मार्ग व विविध महामार्ग यांचे भूमीपूजन मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री यांचे उपस्थितीत सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व पालखी मार्गाकरीता जमीन, निधी व सोई सुविधा उपलब्ध करुन सदर मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) :** (१) संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ व संत तुकाराम महाराज पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ जी चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पंढरपूर यांनी कळविले आहे.
(२) मोहोल-वाखरी-खुडूस (रा.म.९६५) या एकूण ७७.८० कि.मी. लांबीपैकी ५८.३३ कि.मी. लांबी व पाटस-बारामती-इंदापूर-तोंडले (रा.म.९६५जी)एकूण १३०.२० लांबीपैकी ४९.७१ कि.मी. लांबी पूर्ण झाली असून उर्वरित लांबी प्रगतीपथावर असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पंढरपूर यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिडेवाडा, बुधवार पेठ, (जि.पुणे) या वाड्यास राष्ट्रीय स्मारक घोषित करुन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत

**(५) १२१४७ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.जयंत पाटील : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ८८०४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिडेवाडा, बुधवार पेठ, (जि.पुणे) या वाड्यात सावित्रीबाई फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरु केलेली वास्तू पुणे महानगरपालिकेने विकत घेवून दिनांक ५ जून, २००८ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास भिडेवाड्याला राष्ट्रीय स्मारक घोषित करुन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भिडेवाडा, बुधवार पेठ, (जि.पुणे) या वाड्यास राष्ट्रीय स्मारक घोषित करुन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुणे महानगरपालिकेकडे नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींमार्फत निवेदने प्राप्त झाली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) दिनांक १०/११/२०२१ रोजी तत्कालीन मा.मंत्री, अन्न व नागरी पुरवठा यांनी बैठक घेतली असून सदर ठिकाणचे भाडेधारक यांचे पुनर्वसन करण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा संपन्न झाली आहे. तसेच तद्नंतर दिनांक २७/११/२०२१ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात

आली आहे. सदर बैठकीमध्ये भिडेवाड्यातील भाडेकरुंनी सदर जागेवर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक होणेस हरकत नाही, परंतु त्यांच्या व्यवसायासाठी पुनर्वसन त्याच जागेत करावे, अशी मागणी केली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मोहपा नगरपरिषद (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत रस्ता बांधकामाच्या प्रस्तावित दुसऱ्या टप्प्याच्या कामास मंजुरी मिळणेबाबत**

**(६) १२६७९ (२३-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहपा नगरपरिषद (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील वार्ड क्रमांक १५ मधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत रस्ते बांधकामाचा प्रस्ताव दोन टप्प्यामध्ये प्रशासकीय मंजुरी व निधी मंजुरी करीता पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीमार्फत यापैकी पहिल्या टप्प्यास प्रशासकीय मंजुरी व निधी मंजूर करण्यात आला, परंतु दिनांक २२ मार्च, २०२० रोजी सादर करण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्यास मात्र प्रशासकीय मंजुरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित एकच काम दोन टप्प्यामध्ये घेण्यात आलेले असल्याने दुसऱ्या टप्याचे काम प्रशासकीय मंजुरी व निधी अभावी रखडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामाच्या दुसऱ्या टप्प्यास प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार या जिल्हास्तरीय योजनेंतर्गत मोहपा नगरपरिषद, जि.नागपूर यांच्या "वार्ड क्र.१५ श्री कावळे यांचे घरापासून म्हसेपठार गावलगत मोहपा हद्दीपर्यंत रस्ता बांधकाम" या कामांस जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक ०४/०३/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मोहपा नगरपरिषदेने पुन्हा त्याच कामाचा प्रस्ताव दिनांक ०१/०९/२०२१ अन्वये सादर केल्याने त्यानुषंगाने खुलासा सादर करण्याबाबत मुख्याधिकारी यांना जिल्हाधिकारी, नागपूर यांनी निदेश दिले आहेत.

दरम्यान, मोहपा नगरपरिषदेने सुधारित प्रस्ताव दिनांक १२/०५/२०२२ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला असून त्यानुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## पुणे शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(७) १२९५२ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये १५ हजार ३५६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला असून यामध्ये सर्वाधिक टँकर हे रामटेकडी येथील टँकर पॉईंटवरुन गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण साखळी क्षेत्रात यावर्षी मुबलक पाऊस झाला असतानाही शहरवासियांना पिण्याच्या पाण्याकरीता २४ ते २७ हजार टँकर दर महिन्याला लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुण्यातील नागरिकांना सुरळित पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिका लष्कर पाणीपुरवठा विभागांतर्गत रामटेकडी टँकर पॉईंट वरुन आवश्यकतेनुसार दैनंदिन सरासरी टेंडरद्वारे ३५० ते ३६०, पास दराने २५, पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत २८, खात्याच्या गाड्या मार्फत १० ते १२, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शेवाळेवाडी गावास १० टँकर्स पुरविण्यात येतात.

नोव्हेंबर, २०२१ मध्ये असे एकूण ११६४७ टँकर्स पुरविण्यात आले.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुणे महानगरपालिका जुन्या हद्दीसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत प्रकल्प विभागामार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी साठवण टाक्या, मुख्य जलवाहिन्या, वितरण नलिका, पाणीपुरवठ्याचे मोजमाप करण्यासाठी मीटर बसविण्याची प्रक्रिया प्रगती पथावर आहे. सदर योजना पूर्ण करुन कार्यान्वित झाल्यानंतर पुणे शहरात पुरेसे व योग्य दाबाने व सुरळीतपणे पाणीपुरवठा होणार आहे.

तसेच महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट ३४ गावांचे पाणीपुरवठा नियोजन करणेकामी DPR तयार करण्यात येत आहे. प्राथमिक स्वरुपाचे काम पूर्ण झालेले असून सध्या अंतिम आराखडा बनविण्याचे काम चालू आहे. अंतिम आराखडा बनवून त्याची मान्यता प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रीतसर निविदा मागवून सदर भागात पाणीपुरवठा योजनेची कामे सुरु करण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद ते जालना या चार पदरी महामार्गाची दूरवस्था झाल्याबाबत

**(८) १३२१३ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद ते जालना या चार पदरी महामार्गाची दूरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्गालगत मुरुमाची भर टाकण्याची मागणी होत असून सदर महामार्गाच्या कडेला सहा ते सात इंचाचा थर असताना त्यावर मुरुमाची भर टाकल्यामुळे दुचाकी वाहने घसरुन अपघाताच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद ते जालना या चार पदरी महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) :** (१) होय. तथापि, औरंगाबाद जालना खाजगीकरणांतर्गत प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे सदर रस्त्याचे नुतनीकरणाचे काम मार्च २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर रस्त्याच्या ६ कि.मी. लांबीत रस्ता बाजू पट्टी मध्ये सी.एन.जी. गॅस पाईपलाईन चे काम पूर्ण झाले असून बाजू पट्टी मूरुमाने भरुन आवश्यक उतार व दबाई करुन सुस्थितीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चौरेपठार-भोरगड (ता.काटोल, जि.नागपूर) या मार्गाचे डांबरीकरण करण्याबाबत

**(९) १३४८० (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौरेपठार-भोरगड (ता.काटोल, जि.नागपूर) या मार्गावर खडीकरणाचे करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्त्यावरील खडी निघून सदर रस्त्यावरुन वाहने घसरुन अपघात होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करुन सदरहू रस्त्यावर डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) :** (१) सदर निवेदन प्राप्त नाही.
(२) सदर रस्त्याच्या २ कि.मी. लांबीमध्ये डांबरी करणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वेग मर्यादेचे फलक लावण्याबाबत

**(१०) १३५४३ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व राज्य महामार्गावर समतल भाग, घाट भाग, द्रुतगती महामार्ग, महानगरपालिका क्षेत्र या ठिकाणी वाहनांच्या प्रकारानुसार वेगवेगळी वेगमर्यादा निर्धारित करण्यात आली असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावर वेगमर्यादेचे फलक लावण्याचे निर्देश दिलेले असतानाही मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर बहुतांश ठिकाणी वेगमर्यादेचे फलक लावण्यात आले नसल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गावर केंद्र शासनाने चालकासह ८ प्रवासी क्षमता असलेल्या वाहनांसाठी १०० किमी प्रति तास वेगमर्यादेचे बंधन निर्धारित केलेले असतानाही आणि मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दाभील (जि.रत्नागिरी) येथे वेग मर्यादेचे फलक लावण्यात आले नसतानाही वाहतूक पोलिसांकडून नाहक दंड आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दाभील (जि.रत्नागिरी) येथे वेग मर्यादेचे फलक लावण्यात आले नसतानाही वाहनचालकांकडून आकारण्यात आलेले दंड रद्द करण्याबाबत तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सर्वत्र ठळकपणे वेग मर्यादेचे फलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील दाभील जि.रत्नागिरी येथे सद्य:स्थितीत चौपदरीकरणाचे काम प्रगतीत असल्यामुळे सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे आवश्यक फलक लावण्यात आले आहेत.

सदर ठिकाणी वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर ऑनलाईन ई-चलनाव्दारे कारवाई करण्यात येते, असे वाहतूक पोलीस विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत ज्या ठिकाणी चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे,त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे फलक लावण्यात आले आहेत व ज्या ठिकाणी काम पूर्ण झाले आहे, त्या सर्व ठिकाणी वेग मर्यादेचे फलक व इतर आवश्यक सर्व प्रकारचे फलक लावण्यात आले आहेत.

---

## वांद्रे (मुंबई) येथील बॅण्ड स्टॅण्ड परिसरातील बहुमजली "जिवेश" इमारतीला आग लागून दुर्घटना झाल्याबाबत

**(११) १४१५८ (०७-०७-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील बॅण्ड स्टॅण्ड परिसरातील बहुमजली "जिवेश" इमारतीतील १३ आणि १४ व्या मजल्यावर भीषण आग लागण्याची घटना माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीला आग लागण्याची कारणे काय आहेत, आगीत किती जीवित व वित्तहानी झाली आहे,
(३) असल्यास, सदर इमारतीमधील अग्निरोधक यंत्रणा कार्यरत नसल्याचे अग्निशमन दलाच्या निदर्शनास आले असून सुरक्षा उपायांची अंमलबजावणी न केलेल्या इमारतीला नोटीस बजावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अग्निसुरक्षा आणि जीवसुरक्षा कायदा, २००६ नुसार सदरहू इमारतीतील आग प्रकरणातील दोषींवर कारवाई करुन इमारतीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत सदर इमारतीला आग लागण्याच्या कारणाचा तपास केला असता, सदर आग "सदोष विद्युत प्रणाली" मुळे लागल्याचे आढळून आले आहे.

तसेच, सदर आगीत जीवितहानी झालेली नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर इमारतीला लागलेल्या आगीमध्ये १४ व्या मजल्यावरील दरवाजे, इलेक्ट्रिक सामान, ३ बेडरुम, बाथरुम, भिंतीचे व लॉबीचे नुकसान झाले आहे असे गृह विभागाने कळविले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर इमारतीचे मालक/भोगवटादार यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस देण्यात आली असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील सिध्दार्थ कॉलनीतील रहिवाशांचा विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(१२) १४२४७ (०७-०७-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील विकासकाने सिध्दार्थ कॉलनीतील रहिवाशांची पुनर्विकासासाठी संमती मिळावी याकरीता सन २००५ मध्ये "आम्ही तुमची वीज बिले भरु" असे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्विकासाचा प्रकल्प रखडल्यामुळे विकासकाने वीज बिले भरण्याचे आश्वासन देऊनही वीज बिले भरली नाहीत, त्यामुळे उन्हाळयात ३५०० घरांचा विद्युत पुरवठा वीज कंपनीने खंडीत केला असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाने आश्वासन दिल्यामुळे रहिवाशांनी देखील वीज बिले भरली नाहीत तसेच अदानी इलेक्ट्रिसिटीने गत १६ वर्षात एकदाही येथील रहिवाशांना वीज भरणा न केल्याबाबत नोटीस बजावली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी विकासकावर कारवाई करुन रहिवाशांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०२२) :** (१), (२) व (३) सदर बाबी संस्था व विकासक यांच्याशी संबंधित आहेत. त्यामुळे सदर बाबींशी शासनाचा संबंध येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खोणी, शिरढोण (डोंबिवली, जि.ठाणे) गावातील म्हाडा लॉटरी विजेत्यांना घराचा ताबा देण्याबाबत

**(१३) १४६७८ (०१-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ४८९१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोणी, शिरढोण (डोंबिवली, जि.ठाणे) गावात म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडून अत्यल्प उत्पन्न गटासाठी प्रत्येकी दोन हजार सदनिका बांधण्यात आल्या असून सदर घरांची लॉटरी सन २०१८ मध्ये काढण्यात आली होती, त्यानुसार म्हाडाचे ६ हप्त्यांत सर्व पैसे भरलेल्या लॉटरी विजेत्यांना घरांचा ताबा सन २०२१ मध्ये देण्यात येणार होता, तथापि, म्हाडा लॉटरी विजेत्यांना घरांचा ताबा मिळाला नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधितांना घरांचा प्रत्यक्ष ताबा मिळण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदरहू घरांचा ताबा लवकरात लवकर मिळावा म्हणून सर्व हप्ते भरलेल्या संबंधितांनी म्हाडाकडे सातत्याने मागणी करुनही म्हाडाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन म्हाडा लॉटरी विजेत्यांना त्यांच्या घराचा प्रत्यक्ष ताबा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत खोणी (डोंबिवली, जि.ठाणे) येथे २०३२ अत्यल्प उत्पन्न गट सदनिकांची सोडत काढण्यात आली. या सोडतीमधील १८७ यशस्वी लाभार्थ्यांनी अंदाजे ५०% ते ९०% रक्कम तसेच शिरढोण (डोंबिवली, जि.ठाणे) येथे सन २०१८ मध्ये १९०५ अत्यल्प उत्पन्न गट सदनिकांची सोडत काढण्यात आलेली आहे. सदर सोडतीमधील १६४ यशस्वी लाभार्थ्यांनी अंदाजे ५०% ते ९०% रक्कम भरलेली आहे. या दोन्ही प्रकल्पातील घराचा ताबा जून २०२१ मध्ये देण्याचे प्रस्तावित होते. तथापि, कोवीड महामारीमुळे इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही, हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू दोन्ही प्रकल्पातील बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींच्या भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी नियोजन प्राधिकरण तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सदर योजनेला निवासी पाणीपुरवठा प्राप्त होण्यासाठी म्हाडाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास विहित रक्कम भरली आहे. भोगवटा प्रमाणपत्र व जलजोडणी प्राप्त झाल्यानंतर म्हाडा लॉटरी विजेत्यांना घरांचा प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोसेसरी-भवाडी (ता.डहाणू, जि.पालघर) दरम्यान सुर्या नदीवर पूल व जोडरस्ते बांधण्याबाबत

**(१४) १४६७९ (०१-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोसेसरी-भवाडी (ता.डहाणू, जि.पालघर) तसेच लगतच्या ५-६ गावातील शालेय विद्यार्थी, महिला, वृध्द नागरिकांना दैनंदिन व्यवहार व बाजार करण्यासाठी कासा येथे जातांना कोसेसरी-भवाडी दरम्यानच्या सुर्या नदीवर पूल नसल्यामुळे तरफा किंवा लाकडी होडीद्वारे धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुर्या नदीवर पूल व जोडरस्ते बांधण्याबाबत मागील ५ वर्षापासून मा.पालकमंत्री,पालघर, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, जिल्हाधिकारी,पालघर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर इ. कडे लेखी निवेदनाद्वारे सातत्याने मागणी केली आहे तसेच या परिसरातील अनेक ग्रामपंचायतीनीही वारंवार ठराव करुन पूल बांधण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोसेसरी-भवाडी दरम्यान सुर्या नदीवर पूल व जोडरस्ते बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. जवळचा मार्ग म्हणून गावकरी होडीचा प्रवास करतात.
(३) व (४) कोसेसरी व सोलशेत गाव अन्य बारमाही रस्त्याने जोडले गेलेले आहेत. नवीन पुलासाठी एवढया मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध नसल्याने तसेच शासनाच्या कामांचा प्राधान्यक्रम विचारत घेता सद्य:स्थितीत कोसेसरी ते सोलशेत असा नविन रस्ता रस्ते विकास आराखड्यात समाविष्ट करुन सदर रस्त्यासाठी भूसंपादन, वनजमिनीचे अधिग्रहण, रस्ता बांधकाम व नवीन पूल बांधकाम शक्य नाही.

---

## राज्य शासनाने मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) चा रुपये एक हजार कोटींचा निधी थकविल्याबाबत

**(१५) १४६८६ (२०-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरप्रदेशात स्वस्त व जलद वाहतूक उभारण्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाच्या समान गुंतवणूकीतून मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) ची स्थापना करण्यात आली आहे, मात्र सन २०२० पासून आर्थिक स्थिती बिकट असल्याचे कारण देत राज्य शासनाने एमआरव्हीसीचा रुपये एक हजार कोटींचा निधी थकविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई लोकलचे संपूर्ण वातानुकूलीकरण करण्यासाठी १९१ वातानुकूलीत लोकलची बांधणी करण्यात येणार आहे, माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये रेल्वे मंत्रालयाने या लोकलच्या बांधणीला मंजूरी दिली आहे, यासाठी आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी लोकल बांधणीची तयारी दर्शविली आहे, मात्र राज्य शासनाकडून निधी थकविल्यामुळे मुंबई शहरी वाहतूक प्रकल्पातील (एमयूटीपी) सर्वच प्रकल्प थांबविण्यात आले आहेत, असे रेल्वे अधिकाऱ्यानी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशात विरार-डहाणू चौपदरीकरण आणि पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय मार्गाचे काम सुरु आहे, या कामातील कंत्राटदारांची रुपये ५५० कोटीची बिले निधी नसल्याने एमआरव्हीसीने दिलेली नाहीत, तसेच मध्य आणि हार्बर रेल्वेवरील १० स्थानके व पश्चिम रेल्वेवरील आठ स्थानकांत सुधारणा करण्यात येणार असून या सुधारणा करण्यासाठी निविदा पूर्व तयारी पूर्ण झाली आहे, मात्र निधी नसल्याने निविदा मागवण्यात येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरी वाहतूक प्रकल्पाची (एमयूटीपी) रखडलेली कामे पूर्ण होण्याकरीता राज्य शासनाने मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) चा रुपये एक हजार कोटींचा थकवलेला निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

मुंबई उपनगर रेल्वे सेवेच्या सक्षमीकरणासाठी रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या समप्रमाणातील वित्तीय सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळातर्फे टप्पा-१,२,३ व ३अ विविध टप्प्यामध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) राबविण्यात येत आहेत. एमयुटीपी टप्पा-१ व २अ प्रकल्पांची कामे यापूर्वीच पूर्ण करण्यात आली आहेत. एमयुटीपी-२ब, ३ व ३अ प्रकल्पांची कामे प्रगतीच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत.

एमयुटीपी-२ व ३ प्रकल्प किंमतीतील कर्जाचा भाग वगळता उर्वरित निधी राज्य शासनाचे वतीने एमएमआरडीए व सिडकोमार्फत वहन करण्यात येत आहे. सन २०२०-२१ मधील कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च व महसूल प्राप्तीतील घट यामुळे एमयुटीपी प्रकल्पासाठी वेळेवर निधी उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण झाल्या.

एमयुटीपी-२अ प्रकल्पाच्या रुपये ५३०० या मूळ मंजूर किंमतीमध्ये रुपये २३३३ कोटी रेल्वेने त्यांच्याकडील जमिनीचे विकसन करून उभारणे आवश्यक होते. तथापि, रेल्वे विभागाकडून याप्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

राज्य शासनाने एमयुटीपी-१ प्रकल्पासाठी रुपये २२५० कोटी तर एमयुटीपी-२ साठी आतापर्यंत रुपये ३३०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. एमयुटीपी-३ प्रकल्पावर आतापर्यंत झालेल्या खर्चापोटी आतापर्यंत सुमारे रुपये ४२५ कोटी निधी उपलब्ध केला आहे.

(२) एमयुटीपी-३अ प्रकल्पांतर्गत १२ डब्यांच्या १९१ वातानुकूलित रेल्वे गाड्या खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत विरार-डहाणू चौपदरीकरण आणि पनवेल-कर्जत कामांच्या कंत्राटदारांची कोणतीही देयके प्रलंबित नाहीत. राज्य शासनाकडून एमयुटीपी प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला असल्याने एमआरव्हीसीकडून १८ स्थानकांत सुधारणा करण्यासाठी निविदा प्रक्रियेच्या कामाला गती देण्यात आली आहे.
(४) व (५) सन २०२०-२१ मधील कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च व महसूल प्राप्तीतील घट यामुळे एमयुटीपी प्रकल्पासाठी वेळेवर निधी उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. तथापि, पुढील काळात आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

---

## उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषद हद्दीतील रेखांकन नियमबाह्य पध्दतीने मंजूर केल्याबाबत

**(१६) १४८१६ (०३-०७-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर १०५ (पार्ट) मधील सुधारित रेखांकन नियमबाह्य पध्दतीने मंजुरीची शिफारस करुन अंतिम सीमांकन करण्यासाठी पाठविल्याने संबंधित मुख्याधिकारी व रचना सहाय्यक यांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करणेबाबत दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी नगरपरिषद सदस्य, उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, MRTP ACT १९६६ चे कलम ५१ अन्वये तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी सदर रेखांकन रद्द केल्याने सबंधिताने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी माघारी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी तत्कालीन दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याऐवजी आर्थिक संगनमताने एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन बांधकाम नियमावली २०२० मधील नियमाचे उल्लंघन करुन जमीन मालकाचा फायदा करून देण्यासाठी कमी क्षेत्रफळाचे अंतर्गत रस्ते रेखांकनामध्ये दर्शवून Area Under Internal Roads तसेच Area Under D.P. Road न दर्शविता अंदाजे (१००+३०६.९० चौ.मी.) क्षेत्र कमी दर्शवून रहिवासी क्षेत्र जास्तीचे दर्शवून जमीन मालकाला फायदा मिळवून दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर व दोषींना सहकार्य करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) अशा स्वरुपाची तक्रार जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे दाखल केलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सर्व्हे क्र. १०५ मधील ३० आर. क्षेत्राच्या रेखांकनास नगरपरिषद उस्मानाबाद यांचेकडून दिनांक २१/०७/२००५ अन्वये तात्पुरती मंजूरी देण्यात आली होती. सदर मंजूरी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये दिनांक २१/०३/२०१७ रोजी रद्द करण्यात आले होती.

तद्नंतर श्री.श्रीकांत बब्रुवान बलवंडे, श्री.केरबा यादवराव जाधव व इतर यांनी दिनांक २६/०४/२०२१ रोजी रहिवासी प्रयोजनार्थ सीमांकन करणेकामी तात्पुरत्या स्वरुपाची मंजूरी मिळणेकरीता अर्ज दाखल केला होता.

सदर रेखांकनास मुख्याधिकारी, उस्मानाबाद यांचेमार्फत दिनांक २५/१०/२०२१ अन्वये तात्पुरत्या स्वरुपाची मंजूरी देण्यात आली आहे.

सदर परवानगीसाठी उपअधीक्षक भूमी अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद यांचेकडील मोरक्र.४२६, ४२७ व ४२८/२००५ मोजणी दिनांक १८-२० फेब्रुवारी, २००५ ची दिनांक ३०/०३/२०२१ ची नक्कल विचारात घेतली आहे.

सदर प्रकरणी नगर परिषदेस हस्तांतरीत केलेले रेखांकनातील क्षेत्र व मोजणी नकाशा व यामध्ये प्रथमदर्शी विसंगती आढळून येते.

सदर प्रकरणातील प्राप्त तक्रार तसेच क्षेत्राबाबत आढळून आलेली विसंगती या अनुषंगाने प्रकरण तांत्रिकदृष्टया तपासून पुढील कार्यवाही करण्याबाबतचे निदेश संचालक, नगर रचना यांना देण्यात येत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर (जि.नागपूर) ग्रामीण मधील बेसा बेलतरोडी, पिपळा घोगली व ग्रामपंचायत बहादुरा अंतर्गत खरबी-गोन्हिसीम ग्रामपंचायतींची दर्जावाढ करुन नगरपरिषद करणेबाबत

**(१७) १४८६२ (०७-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) ग्रामीण मधील बेसा-बेलतरोडी गट ग्रामपंचायत, पिपळा-घोगली गट ग्रामपंचायत व ग्रामपंचायत बहादुरा अंतर्गत खरबी-गोन्हिसीम ह्या नागपूर शहरालगतच्या पेरीअर्बन भाग असलेल्या मोठ्या ग्रामपंचायती असून बेसा-बेलतरोडी चा भाग शहरी व व्यापक स्वरुपात लेआऊट ने व्यापला असून पिपळा-घोगली भागाचे शहरीकरण झालेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकसंख्योच्या प्रमाणात बेसा-बेलतरोडी ५०००० पेक्षा जास्त, पिपळा-घोगली ३०००० पेक्षा जास्त व ग्रामपंचायत बहादुरा अंतर्गत खरबी-गोन्हिसीम ५०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेरीअर्बन व शहरी भागामुळे उपरोक्त ग्रामपंचायती विकास कामांकरीता सक्षम नसल्यामुळे आवश्यक मूलभूत सुविधा पुरविण्यास अडचण निर्माण होवून या भागाचा विकास रखडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्रामपंचायती संलग्न करुन नगरपरिषद करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १८ जून, २०१९ रोजी नगरविकास विभागाकडे सादर केला असून याप्रकरणी शासन निर्णय होवून नगरपरिषद करणेबाबत दर्जावाढ झाली नसल्यामुळे विकास कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर ग्रामीण मधील बेसा-बेलतरोडी गट ग्रामपंचायत, पिपळा-घोगली गट ग्रामपंचायत व ग्रामपंचायत बहादुरा अंतर्गत खरबी-गोन्हिसीम ग्रामपंचायतींची दर्जावाढ करून नगरपरिषद/नगरपंचायत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५)

- नागपूर जिल्ह्यातील बहादुरा-खरबी-गोन्हिसीम ही ३ महसूली गावे समाविष्ट असलेली बहादुरा ग्रामपंचायत तसेच ग्रामपंचायत बेसा-बेलतरोडी व ग्रामपंचायत पिपळा-घोगली यांचे क्षेत्र नागपूर महानगरपालिकेपासून ९ ते १२ कि.मी. अंतरावर असून शहरीकरण भागाच्या लगत आहेत.
- सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायत बहादुराची लोकसंख्या १८४१३, ग्रामपंचायत बेसा-बेलतरोडीची लोकसंख्या ८१५३ व ग्रामपंचायत पिपळा-घोगलीची लोकसंख्या २४५४ इतकी आहे.
- गट ग्रामपंचायत बहादुरा या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी व ग्रामपंचायत बेसा-बेलतरोडी व ग्रामपंचायत पिपळा (घोगळी) या ग्रामपंचायतीचे एकत्रित क्षेत्र बेसा-पिपळा या नावाने नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
- सदरच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासंदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-३४१क मधील तरतूदीनुसार प्रस्ताव तपासण्यात आला असून या ग्रामपंचायतीमध्ये एकूण रोजगाराची टक्केवारी व त्याअनुषंगिक ग्रामपंचायतीचा कालावधी, सर्व्हे क्रमांकाची यादी इत्यादी माहिती जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून दिनांक १४ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे.
- सदर माहिती नुसार प्रस्ताव तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील मौजा तरोडी खुर्द येथील सदनिकाधारकांना सर्वांसाठी घरे योजनेंतर्गत मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) १४८६४ (०१-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील मौजा तरोडी खुर्द सर्व्हे नं. ६३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्वांसाठी घरे योजनेंतर्गत सदनिकांचे बांधकाम करण्यात येवून २३७४ सदनिकांपैकी २००० सदनिकाचा ताबा सदनिकाधारकांनी घेऊन वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात मूलभूत सुविधा नसल्याकारणाने सदनिकाधारकांनी याबाबतचे निवेदन आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (नामप्रविप्रा) यांना दिनांक ५ मे, २०२२ रोजी दिले असून यामध्ये प्रामुख्याने मूलभूत सुविधा उभारणे, लिज डीड करुन पट्टा देणे, मल:निस्सारणा हेतू तयार एस.टी.पी. कार्यान्वयन करणे, नाला खोलीकरण व रुंदीकरण तथा मोबाईल नेटवर्क हेतू मोबाईल टॉवर उभारणे, बगीच्याचा विकास करणे व रस्ता बांधकाम इ. मुद्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदनिकाधारकांच्या समस्येंतर्गत आवश्यक मूलभूत सुविधा उभारणे नागपूर सुधार प्रन्यास ची जबाबदारी असूनही याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्वांसाठी घरे योजनेंतर्गत सदनिकाधारकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) नागपूर शहरात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत घटक क्र.०३ खाली मौजे तरोडी (खुर्द) सर्व्हे नं.६३ मध्ये २३७४ सदनिकेच्या प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीची मंजुरी प्राप्त आहे. सदर प्रकल्पांतर्गत घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून आत्तापर्यंत १४७० घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला आहे.
(२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) सदर प्रकल्पांतर्गत मल:निस्सारण, एस. टी. पी., नाला खोलीकरण व रुंदीकरण तसेच रस्त्यांचे काम करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे बगीच्यासाठी आवश्यक जागा सोडण्यात आली आहे व लीज डीड करण्याच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडून करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## नागपूर येथील शासकीय इमारतींची देखभाल दुरुस्तीच्या कामांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) १४९४६ (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील रविभवन, नागभवन, आमदार निवास, मुख्यमंत्री यांचे सचिवालय, हैदराबाद हाऊस इ. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील इमारती व निवासस्थाने यांची देखभाल दुरुस्तीची कामे गत २ वर्षापासून सन २०२०-२०२१ पासून रखडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देखभाल, दुरुस्तीसाठी निधी मंजूर असूनही अद्याप निधी अप्राप्त असल्याने कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू इमारतींच्या देखभाल, दुरुस्तीच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२६-०८-२०२२) :** (१) व (२) मागील दोन वर्षांमध्ये राज्यात सुरु असलेल्या कोविड-१९ महामारीमुळे इमारती परिरक्षण व दुरुस्तीकरीता टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याने काही प्रमाणात दुरुस्तीची कामे रखडली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) सन २०२०-२१ मध्ये नागपूर मंडळास कार्यालयीन व निवासी इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीकरीता अनुक्रमे रुपये ३१.४६ कोटी व रुपये १५.१९ कोटी तर सन २०२१-२२ मध्ये अनुक्रमे रुपये ५४.५६ कोटी व रुपये २८.४४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये नागपूर मंडळास दिनांक ८/०७/२०२२ अखेर कार्यालयीन व निवासी इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीकरीता अनुक्रमे रुपये १०.०४ कोटी व रुपये ६.९५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

## मानेवाडा-बेसा-घोगली-वेळाहरी (ता.नागपूर ग्रामीण, जि.नागपूर) मार्गाचे रुंदीकरण व सिमेंटिकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२०) १४९४९ (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेवाडा-बेसा-घोगली-वेळाहरी (ता.नागपूर ग्रामीण, जि.नागपूर) या मार्गाचे रुंदीकरणासह सिमेंटीकरणाचे मंजूरी मिळालेले काम बेसा येथील व्यंकटेश सिटीपर्यंत झाले असून त्यापुढील काम गत २ वर्षापासून रखडले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावर सुमारे १० शाळा, मिहान प्रकल्प असून भागाचे शहरीकरण झाल्यामुळे वाहतूक वाढली असून रस्त्यांच्या अपूर्ण कामामुळे वाहतुकीस अडथळे येत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्याने, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मानेवाडा-बेसा-घोगली-वेळाहरी मार्गाचे रुंदीकरण व सिमेंटिकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २८/०४/२०२२ ला कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सद्य:स्थितित काम प्रगतीत असून एप्रिल, २०२३ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.